**(इंग्रजीत टंकलिखित न्यायनिर्णयाचा मराठी अनुवाद)**

**मुंबई येथील उच्च न्यायालयाच्या न्यायधिकारात.**

नागपूर खंडपीठः नागपूर

रिट याचिका क्र. १३८३/२०२२

डॉ. सुनील वल्द नीलकंठ वाशिमकर,
वय ५१ वर्ष,
व्यवसाय – शासकीय नोकरी,
राहणार ३५ मुरारी अपार्टमेन्टस,
अशोक कॉलनी, खामला,
नागपूर ४४००२५ (भ्रमण ध्वनी क्रमांक - ९८२३०६५३८०)
(ई-मेलः sunil_wash@rediffmail.com) ..... याचिकाकर्ता

- **विरुद्ध** -

१) महाराष्ट्र राज्य,
मार्फत त्यांचे सचिव,
वैद्यकीय शिक्षण आणि औषध विभाग,
मंत्रालय, मुंबई- ३२.

२) संचालक,

वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन,
सेंट जॉर्ज हॉस्पिटल,
मुंबई.

३) महाराष्ट्र लोक सेवा आयोग,

मार्फत त्यांचे सचिव (सरळ सेवा भरती),

यांचे कार्यालय,
५७८ वा मजला, कुप्रेझ टेलिफोन,
एक्सचेंज बिल्डिंग, महर्षि कर्वे रोड,
कुपरेज, मुंबई – ४०००२१. ...... उत्तरवादी

-------------------

श्री. ए. ए. नाईक याचिकाकर्त्याचे वकील.
श्री. डी. एल. धर्माधिकारी, सहाय्यक सरकारी वकील.
उत्तरवादी क्रमांक ०१ ते ०३.

**न्यायमंच : सुनील बी. शुक्रे,**
**श्रीमती वृषाली व्ही. जोशी, न्यायमूर्ति**

**तारीख : १३/०२/२०२३.**

**<u>मौखिक न्यायनिर्णय</u> (द्वारा सुनील बी. शुक्रे, न्यायमूर्ति).**

१. म्हणणे ऐकले.

२. दस्ताऐवज-ए म्हणून चिन्हांकित केलेला पुर्सिस, दस्ताऐवज -ए १, ए २ आणि ए ३ म्हणून चिन्हांकित केलेले तीन दस्ताऐवजासकट दाखल करण्यासाठी परवानगी दिली आणि पुर्सिस आणि कागदपत्रांच्या प्रती विद्वान सहाय्यक सरकारी वकील यांना त्वरित पुरविण्यात याव्या.

३. **अधिनिर्णय**. अधिनिर्णय जारी करून त्वरित परत मागविण्यात आला. पक्षांच्या विद्वान वकिलांच्या संमतीने शेवटची सुनावणी झाली.

४. याचिकाकर्ते सुपरस्पेशालिटी हॉस्पिटल, सरकारी वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर येथे सहयोगी प्राध्यापक आहेत. जाहिरात क्रमांक ००८/२०२१ द्वारे कार्डिओलॉजीमधील पात्र सहयोगी प्राध्यापकांकडून ज्या पदासाठी अर्ज आमंत्रित केले होते त्याच्या प्रतिसादात याचिकाकर्त्याने कार्डिओलॉजीमधील प्राध्यापक या पदाच्या नियुक्ती आणि निवडीसाठी अर्ज केला होता. आपल्या अर्जासह, याचिकाकर्त्याने सर्व आवश्यक कागदपत्रे, ज्यात पेपर प्रकाशनांच्या प्रती आणि याचिकाकर्त्याच्या संशोधन पत्रांच्या स्वीकृतीच्या तारखा दर्शविणारी पत्रे जी त्यांच्या विहित नियतकालिकात प्रकाशनासाठी पाठवली होती ती सर्व संलग्न केली होती. परंतु अर्जाच्या छाननीदरम्यान, याचिकाकर्ता निवड आणि नियुक्ती प्रक्रियेत भाग घेण्यास अपात्र असल्याचे आढळून आले. एम. पी. एस. सी. चा याचिकाकर्त्याला

कार्डिओलॉजीमधील प्राध्यापक पदासाठी "अपात्र" ठरवण्याचा निर्णय त्याला दिनांक ०४/०३/२०२२ रोजीच्या ई-मेलद्वारे पाठविला गेला होता. मात्र, हा ई-मेल याचिकाकर्त्याला चुकीच्या ई-मेल आयडीवर "Sunil-wash@rediffmail.com" यावर पाठवण्यात आला होता, परंतु याचिकाकर्त्याचा योग्य ई-मेल आयडी "sunil_wash@rediffmail.com" हा होता आणि त्यामुळे याचिकाकर्त्याला सदर ई-मेल प्राप्त झाला नाही.

५. काही काळानंतर, याचिकाकर्त्याला निवडयादी मध्ये छाननी केलेल्या उमेदवारांची नावे आढळली आणि जेव्हा त्याला त्याचे नाव गहाळ आढळले तेव्हा निवड प्रक्रियेत काहीतरी चूक असल्याचे लक्षात आले आणि म्हणून त्याने महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, नागपूर यांच्यासमोर योग्य तो अर्ज दाखल करून एम पी एस सी च्या कारवाईवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. न्यायाधिकरणासमोर सुनावणीदरम्यान, याचिकाकर्त्याला तो निवड प्रक्रियेत भाग घेण्यास अपात्र असल्याची माहिती मिळाली. एम. पी. एस. सी. ने त्याच्या चुकीच्या ई-मेल आयडीवर केलेला तो संवाद होता आणि याचिकाकर्त्याने हे तथ्य न्यायाधिकरणाच्या निदर्शनास आणून दिले की दिनांक ०४/०३/२०२२ रोजीची ई-मेलची प्रत्यक्ष प्रत याचिकाकर्त्याच्या विद्वान वकिलांना सुपूर्द करण्यात आली होती आणि त्यानंतरच याचिकाकर्त्याला खरोखर आणि वास्तविकपणे कळले कि तो निवड प्रक्रियेत भाग घेण्यास अपात्र आहे. तथापि, न्यायाधिकरणाने या त्रुटीची कोणतीही दखल न घेता, एम. पी. एस. सी. चा निर्णय कायम ठेवत याचिकाकर्त्याचा अर्ज फेटाळून लावला .

६. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाने पारित केलेल्या खारिज आदेशामुळे व्यथित होऊन याचिकाकर्त्याने या न्यायालयात धाव घेऊन सदर याचिका दाखल केली आहे.

७. याचिकाकर्त्याचे विद्वान वकिलांनी असा युक्तिवाद केला कि एम. पी. एस. सी.

ने पारित केलेला बरखास्तीचा आदेश या प्रकरणाच्या सर्व संबंधित पैलूंचा विचार न करता पारित करण्यात आला आहे. विशेषतः याचिकाकर्त्याचा शोधनिबंध संबंधित आंतरराष्ट्रीय नियतकालिकाद्वारे प्रकाशनासाठी दिनांक १९/०८/२०२१ रोजी स्वीकारण्यात आला होता जी तारीख अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या तारखेच्या म्हणजे २६/०८/२०२१ च्या बऱ्याच आधी होती आणि म्हणून सदर आदेश कायद्याच्या दृष्टीने अयोग्य आहे.

८. उत्तरवादिची बाजू मांडणारे विद्वान सहाय्यक सरकारी वकील यांनी याचिकेला विरोध केला आहे. त्यांच्या मते, एम. पी. एस. सी. ने घेतलेला निर्णय तज्ज्ञ समितीच्या निर्णयावर आधारित आहे. ते सादर करतात की एम. पी. एस. सी. ने घेतलेला पहिला निर्णय तज्ञ समितीने आधी घेतलेल्या निर्णयावर आधारित होता आणि त्यानंतर जेव्हा हे प्रकरण पुन्हा नव्याने विचार करण्यासाठी तज्ञ समितीकडे पाठविण्याचे निर्देश देण्यात आले तेव्हा तज्ञ समितीला असे आढळले की "रेट्रोस्पेक्टिव्ह स्टडी ऑफ क्लिनिकल अँड एपिडेमियोलॉजिकल पॅरामीटर्स ऑफ पीसीआय पीए" या विषयावरील चौथा संशोधन पेपर अर्जाच्या देय तारखेनंतर म्हणजेच २६/०८/२०२१ नंतर प्रकाशित झाला होता आणि म्हणूनच, तज्ञ समितीला नव्याने असे आढळले की याचिकाकर्त्यास निवड प्रक्रियेत भाग घेण्यास पात्र असल्याचे म्हटले जाऊ शकत नाही आणि तज्ञ समितीच्या या अलीकडील मतावर एम. पी. एस. सी. ने विश्वास ठेवला आहे. ते सादर करतात की जेव्हा तज्ज्ञ समिती आपले मत देते, तेव्हा एम. पी. एस. सी. ला तज्ज्ञ समितीच्या मताशी असहमती दर्शविण्याची मुभा नाही आणि खरे पाहाता तज्ज्ञ समितीचे मत देखील या न्यायालयावर बंधनकारक असेल म्हणून त्यांनी असे म्हंटले आहे कि अशा प्रकारे या याचिकेत कोणतेही तथ्य नाही.

९. याचिकाकर्त्याची तक्रार अशी आहे की जरी तो कार्डिओलॉजीमधील प्राध्यापकाच्या पदावर नियुक्तीसाठी जाहिरात क्रमांक ००८/२०२१ द्वारे सुरू केलेल्या

निवड प्रक्रियेत भाग घेण्यास पात्र असला तरी तो अन्यायकारकपणे अपात्र असल्याचे दाखविण्यात आले आहे ज्या मुळे चौकोनाकृती वादाचा आराखडा तयार होऊन वाद प्राधिकरण ते न्यायालय आणि न्यायालय ते तज्ञ समितीकडे असा टोलवल्या जात आहे. त्याच्या उलट बाजूवर, विवाद कमी होत आहे. आता, भारतीय वैद्यकीय परिषद/राष्ट्रीय वैद्यकीय परिषदेच्या नियमांनुसार, याचिकाकर्त्याने विहित नियतकालिकात सादर केलेल्या चार संशोधन पत्रांपैकी एका संशोधन पेपरच्या विवादात्मक प्रकाशनापुरता याचिकाकर्त्याच्या अपात्रतेचा किंवा अन्यथाचा मुद्दा मर्यादित आहे.

१०. असे घडले की सुरुवातीला छाननी समितीला असे आढळले होते की चार संशोधन पेपरच्या प्रकाशनापैकी दोन संशोधन पेपरचे प्रकाशन भारतीय वैद्यकीय परिषद/राष्ट्रीय वैद्यकीय परिषदेद्वारे तयार केलेल्या नियमानुसार नव्हते. मात्र, छाननी समितीला एक संशोधन पेपर एम सी आय / एन एम सी नियमांनुसार प्रकाशित करण्यात आल्याचेही आढळून आले होते. नंतर, जेव्हा याचिकाकर्त्याला दिनांक ०४/०३/२०२२ रोजी ई-मेलची प्रत्यक्ष प्रत देण्यात आली तेव्हा एम पी एस सी ने याचिकाकर्त्याला अपात्र असा निष्कर्ष काढण्यासाठी आणखी एक कारण दिले होते. सदर ई-मेलमध्ये असे म्हटले होते की याचिकाकर्त्याने शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, कार्डिओलॉजीमधील प्राध्यापकाच्या जाहिराती नुसार कोणत्याही प्रकाशनाच्या प्रती सादर केल्या नव्हत्या. तथापि, पुढे असे नमूद करण्यात आले की याचिकाकर्त्याला आधी 'अपात्र' असा निष्कर्ष काढणे ही एक अनवधानाने केलेली चूक होती. याचिकाकर्त्याने त्याला 'पात्र' मानण्याच्या केलेल्या विनंतीची स्वतंत्रपणे तपासणी केली जात असल्याचे पुढे नमूद करण्यात आले आहे. अर्थात, या पत्रव्यव्हाराच्या आधारे, प्रशासकीय न्यायाधिकरणाने याचिकाकर्त्याचा अर्ज फेटाळला परंतु, केवळ या पत्रव्यव्हाराच, या न्यायालयात प्रभाव असल्याने त्या अंतर्गत सदर याचिकेत उत्तरवादी क्र. ०३ म्हणजे, एम. पी. एस. सी. ला ०९/०३/२०२२ रोजी निर्देश

जारी करून याचिकाकर्त्याच्या विनंतीची तपासणी करणे आणि याचिकाकर्त्याला प्रतिकूल असलेल्या निर्णयाची कारणे स्पष्ट करण्यासाठी पुढील निर्देशासह या विषयावर निर्णय घेण्याचे आदेश देण्यात आले होते.

११. दिनांक ०९/०३/२०२२ च्या निर्देशानंतर, एम. पी. एस. सी. ने तज्ञ समितीच्या माध्यमातून संपूर्ण समस्येकडे नव्याने लक्ष देणे अपेक्षित होते, परंतु तज्ञ समितीने किंवा एम. पी. एस. सी. ने या मुद्द्यावर नव्याने विचार करण्याचा विचार केला नाही आणि एम. पी. एस. सी. ने ०४/०३/२०२२ स्वतःच्या ई-मेलवर विसंबून, ज्याबद्दल आधी चर्चा झाली आहे, आणि चार प्रकाशनांपैकी, नियमांनुसार फक्त एक संशोधन पेपर प्रकाशीत केले होते या आधारावर याचिकाकर्त्याचा दावा नाकारला आणि म्हणून याचिकाकर्ता 'अपात्र' असल्याच्या निष्कर्षाचा पुनरुच्चार केला. या खटल्यातील तथ्ये आणि या न्यायालयाने ०९/०३/२०२२ रोजी जारी केलेल्या निर्देशावर बुद्धीचा वापर न करण्याच्या प्रकरणापेक्षा हे कमी नव्हते. जेव्हा हा मूर्खपणा या न्यायालयाच्या निदर्शनास आणला गेला, तेव्हा या न्यायालयाने त्याची दखल घेतली आणि १३/१०/२०२२ रोजी आणखी एक निर्देश पारित केला. या न्यायालयाने उत्तरवादी क्र. ३- एम. पी. एस. सी. ने याचिकाकर्त्याच्या दाव्याची तो पात्र आहे तो पात्र आहे किंवा नाही या बद्दलच्या दाव्याची तपासणी करावी अन्यथा तज्ञांच्या समितीकडे नव्याने संदर्भ देऊन तपासणी करावी. त्यानुसार, एम. पी. एस. सी. ने हा मुद्दा नव्याने विचारात घेण्यासाठी तज्ञांच्या समितीकडे पाठविला आणि आता, पुर्सिस क्रमांक ०४/२२ असलेल्या नोंदीद्वारे, तज्ञांच्या समितीचा निर्णय अभिलेखात समाविष्ट केला आहे.

१२. तज्ज्ञांच्या समितीच्या नवीन निर्णयाचे आम्ही अवलोकन केले आहे. आधी सांगितल्याप्रमाणे, असे उघडकीस येते की जाहिरातीमध्ये नमूद केल्याप्रमाणे चार संशोधन पेपरच्या प्रकाशनाशी संबंधित वाद आता केवळ एका संशोधन पेपरच्या

प्रकाशनापर्यंत मर्यादित करण्यात आला आहे. पुढे असे दिसून आले आहे की तज्ज्ञांच्या समितीने आता हे मान्य केले आहे की तीन शोधनिबंधांचे प्रकाशन नियमांनुसार आहे आणि त्यांना केवळ " रेट्रोस्पेक्टिव्ह स्टडी ऑफ क्लिनिकल अँड एपिडेमियोलॉजिकल पॅरामीटर्स ऑफ पीसीआय पीए." या शीर्षकाच्या एक संशोधन पेपरच्या प्रकाशनाच्या संदर्भात आक्षेप आहे.

१३. तज्ज्ञांच्या समितीने पुढे असे मत व्यक्त केले आहे की ज्या संशोधन पेपरवर त्यांना आक्षेप आहे तो देय तारखेनंतर म्हणजेच दिनांक २६/०८/२०२१ नंतर प्रकाशित करण्यात आला आहे जी अर्ज दाखल करण्याची शेवटची तारीख होती आणि म्हणूनच याचिकाकर्ता "अपात्र" आहे असे आढळून आले आहे. आमच्या मते तज्ञांच्या समितीचा सदर अभिप्राय विपर्यस्त आहे कारण त्यांना संबंधित तथ्ये आणि याचिकाकर्त्याचे विद्वान वकील श्री. नाईक यांनी सादर केल्याप्रमाणे भारतीय वैद्यकीय परिषदेने जारी केलेली मार्गदर्शक तत्त्वे विचारात घेतले नाही. ही मार्गदर्शक तत्त्वे दस्ताऐवज-ए ३ मध्ये समाविष्ट आहेत, जे असे दर्शवतात की विहित नियतकालिकात संशोधन पेपरच्या प्रकाशनाची आवश्यकता केवळ नियतकालिकातील त्याच्या वास्तविक प्रकाशनाद्वारेच नव्हे तर संशोधन पेपर प्रत्यक्षात प्रकाशित झाले नसले तरी संशोधन पेपर "प्रकाशनासाठी स्वीकारले जाते" या वस्तुस्थितीद्वारे देखील पूर्ण होते. या मार्गदर्शक तत्त्वांबाबत कोणताही वाद नाही. आमच्या मते, या मार्गदर्शक तत्त्वांमुळे याचिकाकर्त्याच्या बाजूने हा मुद्दा सिद्ध झाला आहे, कारण याचिकाकर्त्याचा ज्या चौथ्या संशोधन पेपर ज्याबद्दल तज्ञांच्या समितीने आक्षेप घेतला होता, तो इंटरनॅशनल जर्नल ऑफ सायन्टिफिक रिसर्चच्या संपादकाने प्रकाशनासाठी दिनांक १९/०८/२०२१ रोजी स्वीकारला होता. सदर बाब याचिकाकर्त्याला नियतकालिकाच्या संपादकांकडून दिनांक १९/०८/२०२१ रोजी प्राप्त झालेल्या ई-मेलवरून स्पष्ट झाली आहे. याचिकाकर्त्याने त्याच्या अर्जासह सदर ई-मेलची एक प्रत त्यांच्या अर्जासह देखील निर्विवादपणे सादर केली होती, जी एम. पी. एस. सी. किंवा तज्ञ समितीच्या लक्षात

आली हि गोष्ट भिन्न आहे. अर्थात, सहाय्यक सरकारी वकील यांनी निदर्शनास आणून दिल्याप्रमाणे, दस्ताऐवज-ए १ असे चिन्हांकित केलेले दस्ताऐवज हे दर्शविते की ते ई-मेल याचिकाकर्त्याला नाही तर चौथ्या संशोधन पेपरचे सह-लेखक श्री. अतुल सिंग राजपूत यांना उद्देशून केलेले आहे. दस्तऐवज-ए २ म्हणून चिन्हांकित केलेला आणखी एक दस्तऐवज आहे, जो एक पत्रव्यवहार असून तो उक्त संशोधन पेपरची स्वीकृती असे दर्शवितो आणि जो याचिकाकर्त्यासह दोन्ही लेखकांना संबोधित केले आहे. अशा प्रकरणात अन्यथा देखील दोन लेखकांपैकी एका लेखकाला पत्रव्यवहार केल्यास, संबंधित संशोधन पेपर नियत तारखेपूर्वी प्रकाशनासाठी स्वीकारला गेलेला आहे या वस्तुस्थितीला नाकारता येणार नाही, कारण पेपर दोन लेखकांनी लिहिलेला असून, याचिकाकर्ता हा पहिला लेखक तर श्री. राजपूत हा सह-लेखक आहे. उत्तरवादी क्र. ३ - एम. पी. एस. सी. ला याचिकाकर्ता व अतुल सिंग राजपूत यांनी लिहिलेला चौथा संशोधन पेपर ज्याचे याचिकाकर्ते पहिले लेखक आहेत त्या बाबत कोणताही वाद नाही. चौथ्या संशोधन पेपरचे लेखकत्व असल्याने, दुसऱ्या लेखकाला उद्देशून लिहिलेले दस्ताऐवज- ए १ ई-मेल, याचिकाकर्त्याने ज्या पदासाठी अर्ज केला आहे त्या पदासाठी पात्रता निकषांची पूर्तता करण्याच्या दृष्टिकोनातून त्याचे महत्त्व गमावतो. अन्यथा, आणखी एक ई-मेल आहे जो याचिकाकर्त्याला दिनांक १९/०८/२०२१ रोजी इंटरनॅशनल जर्नल ऑफ सायन्टिफिक रिसर्चच्या संपादकांकडून प्राप्त झाला आहे आणि सदर दस्ताऐवज पृष्ठ ५०-ए वर असून त्यामध्ये याचिकाकर्त्याच्या चौथ्या संशोधन पेपरची स्वीकृती देय तारखेच्या आधी दर्शविली आहे, आणि ज्याची प्रत याचिकाकर्त्याने त्याच्या अर्जासह सादर केली आहे. सदर पृष्ठ ५०-ए वरील हा दस्ताऐवज या संदर्भात उत्तरवादीसाठी विद्वान सहाय्यक सरकारी वकीलांच्या आक्षेपांची प्रभावीपणे पूर्तता करतो आणि आम्हाला ते नाकारण्यास साहाय्य करतो .

१४. एकदा अभिलेखावर जर हे प्रस्थापित झाले असते की प्रकाशनासाठी स्वीकारलेल्या संशोधन पेपरला मेडिकल कौन्सिल ऑफ इंडियाने विविध पदांसाठी

पात्र मानले आहे आणि असे आढळून आले असते की याचिकाकर्त्याचा चौथा संशोधन पेपर दिनांक १९/०८/२०२१ रोजी प्रकाशनासाठी स्वीकारला गेला जी तारीख नियत तारखेच्या म्हणजे २६/०८/२०२१ च्या खूप अगोदरची होती, तर तज्ञ समितीला याचिकाकर्त्याच्या संशोधन पेपरचे प्रकाशन उक्त तारखेनंतर झाले आहे या आधारावर याचिकाकर्ता पात्र नाही असे आढळले नसते. वास्तविक, आंतरराष्ट्रीय नियतकालिकात कोणत्याही संशोधन पेपरचे प्रकाशन हे केवळ संशोधन पेपर प्रकाशनासाठी स्वीकारण्याच्या निर्णयाचा परिणाम आहे आणि हे परिणाम संशोधन पेपर प्रकाशनासाठी स्वीकारल्यानंतर लगेचच होऊ शकतात किंवा अनेक दिवस, महिने आणि वर्षांनंतरही होऊ शकतात. याव्यतिरिक्त, प्रकाशनासाठी आधीच स्वीकारल्या गेलेल्या कोणत्याही संशोधन पेपरचे प्रकाशन हे नियतकालिकातील जागेची उपलब्धता, नियतकालिकाची वारंवारता इत्यादी विविध घटकांवर अवलंबून असते. या गोष्टी संशोधकाच्या नियंत्रणात नसतात आणि वास्तविक, त्या गोष्टीचा एखाद्या विशिष्ट पदासाठी किंवा पात्रतेसाठी संशोधकाची पात्रता निश्चित करण्यासाठी काही फरक पडत नाही. अशा परिस्थितीत जी महत्वाची आहे ती म्हणजे तारीख आणि ज्या तारखेला संशोधन पेपर प्रकाशनासाठी स्वीकारला जातो ती तारीख, कारण ती केवळ अशी स्वीकृती आहे जी प्रकाशनासाठी संशोधन पेपर चे मूल्य दर्शवते. आमच्या मते, हे केवळ त्याच्या प्रकाशनासाठी संशोधन पेपरची योग्यता किंवा पात्रता आहे, जे त्याच्या प्रकाशनाच्या स्वीकृतीच्या निर्णयातून ठरविले जाते, ज्या आधारे संशोधकाचा विशिष्ट पद किंवा अर्हतेसाठी पात्रतेचा मुद्दा निश्चित केला पाहिजे. भारतीय वैद्यकीय परिषदेने जारी केलेली मार्गदर्शक तत्त्वे (दस्तऐवज-ए ३) आमच्या मते अर्थपूर्ण आहेत आणि ते केवळ हे दर्शवतात की भारतीय वैद्यकीय परिषदेने हे स्वीकार केले आहे की संशोधन पेपरच्या योग्यतेबद्दलचे जे महत्त्वाचे निष्कर्ष आहेत ते केवळ त्याच्या प्रकाशनाच्या योग्यतेबद्दल आहेत परंतु ते त्याचे वास्तविक प्रकाशन नाही. तज्ञांच्या समितीने मात्र या प्रकरणाच्या या सर्वात महत्त्वाच्या पैलूवर दुर्लक्ष केले आणि स्पष्टपणे चुकीच्या आणि विपर्यस्त निष्कर्षावर पोहोचले . त्यामुळे त्यात हस्तक्षेप करणे गरजेचे आहे.

१५.	या प्रकरणाचा विचार करता छाननी समितीने वस्तुस्थिती आणि कायद्याच्या गंभीर चुका केल्याचे दिसून येते आणि याचिकेतील समस्येवर निर्णय घेण्यासाठी अजिबात संबंध नसलेल्या गोष्टी विचारात घेऊन स्वतःची दिशाभूल केली आहे. आम्हाला असेही आढळून आले आहे की एम. पी. एस. सी. - उत्तरवादी क्र. ३ ने समिती तज्ञांच्या निर्णयाचे केवळ यांत्रिकरित्या पालन केले आहे, जे त्यांनी नाकारायला हवे होते. कोणत्याही तज्ञ समितीचे मत जर कोणत्याही संबंधित तथ्याच्या विकृतीमुळे किंवा अज्ञानामुळे किंवा काही अप्रासंगिक तथ्याचा विचार करून दूषित केलेले नसेल तरच ते  एम. पी. एस. सी. वर बंधनकारक असेल. त्याच तत्वानुसार, तज्ज्ञ समितीचे मत देखील या न्यायालयाला बंधनकारक नाही आणि म्हणूनच, हस्तक्षेप करण्यायोग्य हे योग्य हे प्रकरण आहे असे आमचे मत आहे.

१६. परिणामतः, याचिकेला परवानगी देण्यात येते. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाने पारित केलेले आक्षेपित आदेश आणि एम. पी. एस. सी. ने घेतलेला आक्षेपित निर्णय याद्वारे रद्दबातल करण्यात येतो .

१७. ०६/०८/२०२१ रोजी प्रकाशित केलेल्या जाहिरात क्रमांक ०८/२०२१ नुसार महाराष्ट्र वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन सेवा, गट - ए अंतर्गत कार्डिओलॉजीमधील प्राध्यापकाच्या पदावर नियुक्तीसाठी अर्जदार पात्रता निकष पूर्ण करतो.

१८.	आम्ही एम. पी. एस. सी.ला निर्देश देतो की महाराष्ट्र वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन सेवा, गट-अ अंतर्गत कार्डिओलॉजीमधील प्राध्यापक पदासाठी निवड आणि नियुक्तीची प्रक्रिया पार पाडावी व याचिकाकर्त्याला निवड प्रक्रियेत भाग घेण्याची परवानगी  देण्यात यावी.

१९. आम्ही एम. पी. एस. सी. ला कायद्यानुसार आणि येथे वर केलेल्या निरीक्षणांच्या प्रकाशात, या न्यायालयाचे रिट प्राप्त झाल्यापासून लवकरात लवकर, शक्यतोवर आठ आठवड्यांच्या आत या प्रकरणात अंतिम निर्णय घेण्याचे निर्देश देतो.

२०. वरील अटींमध्ये नियम परिपूर्ण केला. खर्च काही नाही.

**न्यायमूर्ति** **न्यायमूर्ति**

**"अस्वीकरण "**

"या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या / तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरिता वापर करता येणार नाही. तसेच, इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरीता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणीकरिता वैध मानला जाईल."